# बृहन्मुंबई महानगरपालिका

**परिपत्रक**
२०२०-२१

क्र.प्रले(वित्त)/प्रकल्प/३६ दिनांक०७.१२.२०२०

**विषय:** बृहन्मुंबई महानगरपालिकेची कामे करणाऱ्या कंत्राटदारांकडून कोव्हिड-१९च्या अनुषंगाने नविन कामांमध्ये Performance Guarantee न घेण्याबाबत

**संदर्भ:** १) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण१०२०/प्र.क्र./१००/ २०२०–व्यय -१२ दिनांक २९ जूलै, २०२०
२) परिपत्रक क्र.उपप्रले/व्यय/ I/ ०६ दिनांक १०.०८.२०२०
३) क्र.प्रले(वित्त)/प्रकल्प/ २० दिनांक २०.०८.२०२०
४) क्र.प्रले(वित्त)/प्रकल्प/ २१ दिनांक ०७.०९.२०२०

कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे महानगरपालिकेचे काम करणाऱ्या कंत्राटदारांना चालू कंत्राटामध्ये सोसाव्या लागत असलेल्या विविध अडचणीबाबत उपाययोजना व सहाय्य करण्याबाबत केंद्र सरकार व राज्य सरकारच्या धर्तीवर, परिपत्रक निर्गमित करुन विविध उपाययोजना व सहाय्य देण्यात आलेले आहे. तथापि, या अनुषंगाने प्राप्त झालेल्या सूचनांच्या अनुषंगाने महापालिकेतील कंत्राटदारांना Performance Guarantee बाबत उपरोक्त संदर्भित परिपत्रक क्र.२,३ व ४ मधील नमूद सवलती व्यतिरिक्त खालीलप्रमाणे अतिरिक्त सवलत देण्यात येत आहे :-

१. नव्याने मागविण्यात येणाऱ्या निविदांमध्ये कार्यानुरुप हमीपत्र (Performance Guarantee) कंत्राटदारांकडून घेण्यात येऊ नये.

२.परंतू,सदर कामासाठी,स्विकृतीपत्र (Letter of Acceptance) प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसात २% कंत्राट अनामत रक्कम म्हणून सदर कामाचा दोष दायित्व कालावधी पूर्ण होईपर्यंत वैध असलेले बँक हमीपत्र प्राप्त करणे आवश्यक असेल तसेच काम पूर्ण झाल्यानंतर ५०% रिटेन्शन मनीचे अधिदान केल्यानंतर उर्वरित ५०% रिटेन्शन मनी परत करताना सदर कामाचा दोष



Scanned with CamScanner

दायित्व कालावधी पूर्ण होईपर्यंत हमी म्हणून संबंधित कंत्राटदाराकडून दोष दायित्व कालावधी संपेपर्यंत वैध असणारे बँक हमीपत्र घेणे आवश्यक असेल. अशा प्रकारची अट नव्याने मागविण्यात येणाऱ्या निविदांमध्ये अंतर्भूत करण्यात यावी.

३. तसेच ज्या कामांची निविदा सादर करण्याची अंतिम नियत दिनांक संपूष्टात आली नसेल अशा कामांच्या बाबतीत शुध्दीपत्रक (Corrigendum) काढून उपरोक्त मुद्दा क्रमांक १ व २ अंतर्भूत करण्यात यावा.

४. सदरहू सवलत ही दिनांक ३१.०३.२०२२ पर्यंत मागविण्यात येणाऱ्या निविदांना लागू असेल.

सर्व संबंधित अधिष्ठाता/सहाय्यक आयुक्त/खातेप्रमुख यांनी उपरोक्त निदेशांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

02/12/2020 03/12/2020

प्रमुख लेखापाल (पा.पू.म.नि.)

प्रमुख लेखापाल (वित्त)प्र.

अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)

महानगरपालिका आयुक्त



3/12/2020 3/12/2020 03/12/2020

Scanned with CamScanner